# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:12.05.2026** **वार: मंगळवार**

---

1. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, देशातील साधनसंपत्तीवरचा ताण कमी करण्यासाठी पंतप्रधानांनी नागरिकांना केलं एकजुटीचं आवाहन
2. देशात पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नाही; 60 दिवस पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याची केंद्र सरकारची माहिती
3. पंतप्रधान येत्या शुक्रवारपासून पाच देशांच्या दौऱ्यावर
4. आसामचे मुख्यमंत्री म्हणून हिमंता बिस्वा सरमा यांचा आज शपथविधी आणि
5. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उद्या पासून दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर

**पंतप्रधान**

पश्चिम आशियातील संघर्ष हा या दशकातील सर्वात मोठ्या संकटांपैकी एक आहे; या पार्श्वभूमीवर देशातील साधनसंपत्तीवरचा ताण कमी करण्यासाठी देशवासीयांनी एकत्र यावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमध्ये वडोदरा इथं सरदारधाम वसतिगृहाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. पश्चिम आशियातील संकटाच्या प्रतिकूल परिणामांना सामोरं जाण्यासाठी त्यांनी केलेल्या आवाहनाचा पुनरुच्चारही यावेळी पंतप्रधानांनी केला. ते म्हणाले.....

**पेट्रोल डीजल का उपयोग कम करें। इलेक्ट्रिक बस और पब्लिक ट्रांसपोर्ट का अधिक इस्तेमाल करें। कार पुलिंग को बढ़ावा दें। ये जरूरी है कि सरकारी और प्राइवेट दोनों ही दफ्तरों में वर्क फ्रॉम होम को प्राथमिकता दी जाए। मैं कुछ स्कूलों से भी आग्रह करूंगा कि कुछ समय के लिए ऑनलाइन क्लासेज की व्यवस्था पर काम करें। मैं आप सब से आग्रह करूंगा कि जब तक हालात सामान्य न हो हम सोने की खरीद को टालें।**

**पंतप्रधान-सोमनाथ**

तत्पूर्वी काल सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान, 'सोमनाथ अमृत महोत्सवा'त सहभागी झाले होते. सोमनाथ अमृत पर्व पुढची हजारो वर्ष भारताला प्रेरणा देत राहील, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केलं. गेल्या काही वर्षात देशातल्या अनेक पवित्र तीर्थस्थळांचा कायापालट करण्यासाठी झालेल्या विकासकामांची पंतप्रधानांनी यावेळी माहिती दिली.

**मोदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारपासून संयुक्त अरब अमिरात अर्थात यूएई, नेदरलँडस, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पांच देशांच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी शुक्रवारी यूएईमध्ये पोहोचतील. तिथे त्यांची अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाह्यान यांची भेट नियोजित आहे. दोन्ही नेते द्विपक्षीय मुद्द्यांवर, विशेषत: ऊर्जा सहयोग तसंच परस्पर स्वारस्य असलेल्या, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर आपले विचार मांडतील. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान नेदरलँडसमध्ये राजे विल्यम अलेक्झांडर आणि राणी मॅक्सिमा यांची भेट घेणार असून त्यानंतर ते रॉब जेटन यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत. आपल्या स्वीडन दौऱ्यात स्वीडिश समकक्ष क्रिस्टर्सन यांच्यासह पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

चौथ्या टप्प्यात सोमवारी पंतप्रधान नॉर्वेमध्ये तिसऱ्या भारत नॉर्डिक शिखर बैठकीमध्ये सहभागी होणार आहेत. भारताच्या पंतप्रधानांची नॉर्वेला ही 43 वर्षातील पहिली भेट असेल. आपल्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात, पंतप्रधान, इटलीचे राष्ट्रपती सर्जियो मॅटारेला यांची भेट घेतील आणि पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी चर्चा करतील. अलीकडेच झालेल्या भारत-युरोपियन संघ मुक्त

व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर, भारताची युरोपसोबतची भागीदारी अधिक दृढ होण्यास या दौऱ्यामुळे मदत होईल असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>इंधन पुरवठा</u>**

देशात पेट्रोलियम उत्पादनांचा कोणताही तुटवडा नसून 60 दिवस पुरेल इतक्या कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. पश्चिम आशिया संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगटाच्या बैठकीनंतर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल ही माहिती दिली. देशात 45 दिवस पुरेल इतका स्वयंपाकाचा गॅस आणि 60 दिवस पुरेल इतका नैसर्गिक वायू उपलब्ध असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनीही आंतरमंत्रालयीन बैठकीनंतर वार्ताहरांना याबाबत माहिती दिली. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून, स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठाही सुरळीत सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात या वर्षीच्या खरीप हंगामासाठी खतांचा 51 टक्के साठा उपलब्ध असल्याचं, रसायन आणि खतं मंत्रालयाच्या सहसचिव अपर्णा शर्मा यांनी सांगितलं.

**<u>आसाम मुख्यमंत्री शपथ</u>**

आसाममध्ये, हिमंता बिस्वा सरमा आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. गुवाहाटी इथं खानापारा इथल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानावर या शपथविधी सोहळ्याची तयारी करण्यात आली आहे.
आसाममध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सलग तिसऱ्या कार्यकाळाची, तसंच सरमा यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या सलग दुसऱ्या कार्यकाळाची सुरुवात होणार असून राज्याच्या इतिहासात या पदावर सलग दोनदा विराजमान होणारे ते पहिलेच बिगर-काँग्रेस नेते ठरणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

**<u>ट्रंप दौरा</u>**

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उद्या पासून दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर जाणार आहेत. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयानं काल याबाबत अधिकृत माहिती दिली. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचा हा गेल्या नऊ वर्षांतला पहिला चीन दौरा आहे. ट्रम्प यांनी 2017 मध्ये त्यांच्या पहिल्या कार्यकाळात चीनला भेट दिली होती. तैवान आणि इराणबरोबर दोन्ही देशांच्या सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

**<u>युद्धविराम तणाव</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाबाबत साशंकता व्यक्त केल्यानंतर जागतिक तेल बाजारावर काल परिणाम झाला. कच्च्या तेलाच्या किमती चार टक्क्यांहून जास्त वाढून काही काळ प्रति बॅरल 105 डॉलर्सच्या वर गेल्या होत्या. इराणनं पाठवलेल्या शांतता प्रस्तावावरील प्रतिसादातील अटी पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं.

**<u>शेअर बाजार</u>**

इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविरामावर सहमती होऊ न शकल्याचा फटका देशातल्या शेअर बाजारांनाही मोठ्या प्रमाणात बसला. सेन्सेक्स 1 हजार 313 अंकांनी घसरुन 76 हजार 15 अंकांवर बंद झाला तर निफ्टी 360 अंकांची घट नोंदवून 23 हजार 816 अंकांवर बंद झाला.

**<u>महाराष्ट्र विधान परिषद मतदान</u>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या दहा जागांसाठी आज मतदान होत आहे. नियमित नऊ आणि एका रिक्त जागेची पोटनिवडणूक, अशा दहा जागांसाठी प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे दहा अर्ज दाखल झाले आहेत, तर पाच अपक्षांनी या निवडणुकीसाठी अर्ज दाखल केलेले आहेत. दुपारी चार वाजेपर्यंत मतदान आणि आवश्यता भासल्यास सायंकाळी पाच वाजता मतमोजणी होणार आहे.

**<u>जी राम जी योजना-अधिसूचना</u>**

विकसित भारत जी राम जी, अर्थात 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका अभियान, ग्रामीण कायदा' 2025 लागू करण्यासंदर्भात, केंद्र सरकारनं काल अधिसूचना जारी केली.

येत्या 1 जुलै पासून, देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात, प्रत्येक आर्थिक वर्षात किमान 125 दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल असं या संदर्भात निवेदन देताना केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं.

**आयआयटी मुंबई**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल आय आय टी मुंबई इथं हवेतला कार्बन डायऑक्साइड जमा करून साठवण्याच्या प्रायोगिक तत्त्वावरच्या प्रकल्पाचं, आणि यासाठीच्या खनन प्रक्रियेचं उद्घाटन केलं. या प्रकल्पात कार्बन डायऑक्साइडपासून कॅल्शियम कार्बोनेट तयार करून पोलाद, रंग, सिमेंट आणि घरबांधणी उद्योगांमध्ये चुन्याऐवजी त्याचा वापर केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रधान यांनी दिली. येत्या काही दिवसांत हा प्रकल्प व्यावसायिक तत्त्वावर कार्यान्वित केला जाईल आणि पुढील महिन्यात फ्रान्समध्ये होणाऱ्या भारत इनोव्हेट्स परिषदेत हा प्रकल्प सादर केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**आयसीसी क्रमवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजे आयसीसीनं पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट संघांची क्रमवारी जारी केली असून यामध्ये भारताचा प्रथम क्रमांक कायम राहिला आहे. दुसऱ्या क्रमांकावर न्यूझिलंड तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**आयपीएल क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्सचा 3 गडी राखून पराभव केला. गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात आज संध्याकाळी अहमदाबादमध्ये सामना होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज गुजरात, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, राजस्थान आणि पश्चिम मध्य प्रदेश या भागांत उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे तर येत्या दोन दिवसांत आसाम, मेघालय, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम या भागांत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दिल्लीसह, चंदीगड, उत्तर प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि उत्तराखंड तसंच ईशान्येकडील काही भाग, अंदमान आणि निकोबार बेटं, आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड, लक्षद्वीप, ओडिशातही वीजांसह वादळी पावसाची शक्यता आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.